**नियमित दि. दावा क्र.२७६/२०१२**
**सुशिला वि. दगडू**
**निशाणी क्रमांक–११३**

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ यांचे शपथेवर कथन सुरु–**

नाव- चंद्रशेखर सुभाष लांभाते,

वय- ४२ वर्षे     धंदा- सेतु कार्यालय,

रा.– उपळवे,  ता.फलटण,  जि.सातारा.

**साक्षीदाराचा सरतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.पी.एन.शिंदे यांचेमार्फत शपथेवर सुरु –**

मी प्रतिवादी क्र.१ व २ यांना ओळखतो. मला त्याच्यात झालेल्या वाटणीपत्राची वैयक्तीक माहिती आहे. आता मला वाटणीपत्राची मुळ प्रत दाखवण्यात आली. त्यावर माझी साक्षीदार म्हणून सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. सदरचे वाटणीपत्रास यापूर्वी नि.क्र. १०३ देण्यात आली आहे. सदर वाटणीपत्र लिहून ठेवणार यांनी माझ्या समक्ष वाटणीपत्रावर अंगठे उमटविले होते.  यातील मजकूर दगडू महादू रोमण यांनी सांगितला होता. त्याप्रमाणे सोनवलकर यांनी सदरचा वाटणीपत्राचा दस्त तयार केला. सदर वाटणीपत्र मी वाचले होते. सदर वाटणीपत्राच्या मजकूराची बरोबर असल्याची खात्री करुन लिहून ठेवणार यांनी त्यांचे अंगठे दस्तावर केले व मी त्यावर सही केली. तसेच, दुसरा साक्षीदार मनोहर रावळ यांनी सदर दस्तावर सही केली होती. ती सही मी ओळखतो. सदर वाटणीपत्राचा दस्त दगडू महादू रोमण यांनी दुय्यम निबंधक कार्यालय येथे नोंदवला होता.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर.एच.कर्णे यांचेमार्फत सुरु–**

२.  मी तहसिल कार्यालयाचे संलग्न असलेल्या सेतु कार्यालयामध्ये नोकरीस आहे. माझ्या कामाचा कालावधी सकाळी १०.०० ते रात्री काम संपेपर्यंत असतो. हे म्हणणे खरे आहे की, सेतु कार्यालयाचा अधिकार तहसिलदार साहेब यांच्याकडे आहे.

हे म्हणणे खरे नाही की, सेतु कार्यालय सोडून बाहेर जायचे असेल तर मला तहसिलदार साहेबांची परवानगी घ्यावी लागते. हे म्हणणे खरे आहे की, दुय्यम निबंधक कार्यालय व आमचे सेतु कार्यालय हे दोन्ही विभाग वेगवेगळे आहेत. सदर वाटपपत्र तयार करणे व नोंदवणे या सर्व प्रक्रियेला अंदाजे दिड ते दोन तास लागले होते. हे म्हणणे खरे आहे की, मी वाटणीपत्र दस्ताच्या कामासाठी दुय्यम निबंधक कार्यालयात गेलो तेव्हा त्यासाठी तहसिलदार साहेबांची लेखी किंवा तोंडी परवानगी घेतली नाही. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी सेतु कार्यालयात मी कामावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी आजरोजी न्यायालयात साक्षीस येण्यासाठी तहसिलदार साहेबांची लेखी किंवा तोंडी परवानगी घेतलेली नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.१०३ वरील दाखल वाटपपत्र हे प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित मिळकतीबाबत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दगडू रोमण, मंदा रोमण हे माझ्या नात्यातील आहेत. ते आमच्या शेजारील गावातील असल्याने ओळखीचे आहेत. मला माहित नाही की, दगडू रोमण यांना एक बहिण नामे सुशिला मारुती गायकवाड व एक सख्खा भाऊ बाळू महादू रोमण हे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वाटणीपत्र नोंदवण्याच्या दिवशी मला वेळोशी येथे जाण्याचा प्रसंग आलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाटणीपत्रामध्ये प्रतिवादी क्र.१ व २ यांना वाटणीमध्ये देण्यात आलेल्या क्षेत्राच्या दिशा व चतुःसिमा नमुद केलेल्या नाहीत. सदर वाटणीपत्र करताना मी प्रतिवादी क्र.१ व २ यांना विचारले नाही की, त्यांना इतर वारस आहेत किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, वाटणीपत्राचा दस्त हा प्रतिवादी क्र.१ व २ यांनी नोंदणी करण्यासाठी नेला होता व मला त्याठिकाणी फक्त साक्षीदार म्हणून सही करायला सांगितली. हे म्हणणे खरे आहे की, आजरोजी प्रतिवादी क्र.१ व २ यांना वाटणीपत्राने दिलेल्या जमीनी कोणत्या दिशेला आहेत व त्यांच्या काय चतुःसिमा आहेत हे मला सांगता येणार नाही. दुसरे साक्षीदार रावळ हे भूमि अभिलेख कार्यालयात नोकरीस आहेत. हे म्हणणे खरे आहे की, वाटणीपत्र नोंदविण्याच्या दिवशी रावळ हे भूमि अभिलेख कार्यालयात कामावर होते. मी वाटपपत्राला ओळख

म्हणून सही करणारे संदिप ज्ञानदेव जाधव यांना ओळखतो. हे म्हणणे खरे आहे की, संदिप जाधव हे सिटी सर्वे ऑफिसमध्ये नोकरीस आहेत व वाटपपत्र नोंदविण्याच्या दिवशी ते ऑफिसमध्ये कामावर होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी यांना मदत करण्यासाठी मी आज खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री.पी.एन.शिंदे यांचेमार्फत सुरु–**

४. मी सेतु कार्यालयामध्ये नोकरीस आहे परंतु, मी शासकीय कर्मचारी नाही. माझी नेमणुक ही कंत्राटदार पद्धतीने आहे व सेतु कार्यालयाचे कामकाज माझ्या प्रमाणे चालते.

**फेरतपास पुर्ण.**

**उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. आर.एच.कर्णे यांचेमार्फत सुरु–**

५. आमच्या कंत्राटी पद्धतीने नेमणुकीसाठी जाहिराती व इतर प्रक्रिया या मा. जिल्हाधिकारी यांच्यामार्फत केली जाते. हे म्हणणे खरे नाही की, सेतु कार्यालय हा तहसिल कार्यालयाचा भाग आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कार्यालयाची तालुका स्तरावरील देखरेख ही तहसिलदार यांच्या मार्फत केली जाते.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

फलटण. (ए.एस.साटोटे)
दिनांकः ०९.०६.२०२६ ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क स्तर, फलटण